# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२४/०९/१७

## दि.२३/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४७४/१७,भादविक ३०२,२०१ |
| **फिर्यादी** | संभाजी धनावडे,वय-४५ वर्षे,रा.भिलारेवाडी,हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०९/२०१७ रोजी १४/०० वा.चे पुर्वी कात्रज जुन्या घाटात पुण्याकडुन साता-याकडे जाणा-या मुख्य रस्त्यावरील रमाकांत इलेक्ट्रिक बोर्डाचेमागे पुर्व बाजुस सुमारे १०० मीटर अंतरावर टाकीच्या माळावर नवीन खोदलेल्या वनतळ्या मध्ये,भिलारेवाडी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | दि.२३/०९/२०१७ रोजी १४/०० वा.चे पुर्वी कात्रज जुन्या घाटात पुण्याकडुन साता-याकडे जाणा-या मुख्य रस्त्यावरील रमाकांत इलेक्ट्रिक बोर्डाचे मागे पुर्व बाजुस सुमारे १०० मीटर अंतरावर टाकीच्या माळावर नवीन खोदलेल्या वनतळ्यामध्ये,भिलारेवाडी,ता.हवेली,जि.पुणे येथे एक पुरुष जातीचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे,उंची ५.७ फुट असलेले वर्ण गोरा,बांधा मध्यम, केस सुमारे १ फुट लांब काळे केस,उजव्या कानात चांदीच्या धातुची बाळी,डाव्या हातात पर्पल कलरचा रबर बॅन्ड व त्याच हाताचे करंगळीत चांदीच्या धातुची अंगठी त्यावर (Friends) असे लिहिलेले या वर्णनाचे इसमास,कोणीतरी अज्ञात इसमाने,अज्ञात कारणा वरुन,कुठल्यातरी धारदार शस्त्राने त्याचा गळा कापुन,डावे डोळयाच्या भुवईवर व चेह-यावर वार करुन,पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने,तसेच ओळख पटु नये म्हणुन,सदर मयत अनोळखी इसमाच्या अंगावरील कपडे काढुन,त्याचे चेह-यावर जखमा करुन चेहरा विद्रुप करुन त्यास जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कमलाकर ताकवले ९८२३३०१०३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २८२/१७,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | सुशील नारकर,वय-३९ वर्षे,रा.संतनगर,सहकारनगर,पुणे |
| **आरोपी** | महेश धोंडीराम सुर्यवंशी,वय-१९,रा.मार्केटयार्ड,पुणे,मुळगाव-ता.अहमदपुर,जि.लातुर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०९/१७ रोजी सकाळी ०९/१५ वा.तळजाई टेकडीवरील नवीन बनविलेल्या सिमेंट रोडच्या कॉर्नरवर सहकारनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्याची पत्नी असे सकाळी प्रभात फेरी मारण्यासाठी तळजाई टेकडीकडे जाणा-या रोडने पायी जात असताना,यातील नमुद इसम महेश धोंडीराम सुर्यवंशी याने फिर्यादी यांचे पत्नीच्या हातातील मोबाईल १५,०००/- रु किंमतीचा जबरदस्तीने हिसकावुन घेऊन चोरी करुन पळुन जात असताना सदर इसम हा बिकानेर चौक येथे मिळुन आला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.एस.सरडे ९९२२६८६४४४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३५८/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | मयुर गरुड,वय-३० वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०९/२०१७ रोजी सकाळी १०/०० वा. ते दुपारी ०३/३० वा चे दरम्यान स.नं.५१ प्लॉट नं.१०,गगनगिरी कॉलनी,अशिष गार्डन समोर कोथरुड,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील लाकडी कपाटातील कॅमेरा,महत्वाचे कागदपत्रे व सोन्याचे दागिने असा एकुण ४,५०,०००/- रु किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. धोत्रे ८४२२९९५१५२ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २९६/१७,भादविक ४५७,३८०,५११ |
| **फिर्यादी** | परिमल कुलकर्णी,वय-२८,रा.वडगाव-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०९/१७ रोजी २०/०० वा. ते दि.२३/०९/१७ रोजी सकाळी ०७/०० वा.चे दरम्यान सिंहगड रोड स.नं.१२,एपीएलबीपीएल,५४५/१४,बी असणारे इमारतीचे तळमजल्यावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वरीलठिकाणी नऊवारीचा नखरा या नावाचे कपडयाचे दुकान असुन, त्यांचे कापड दुकानाचे शटर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे दुकानाचे शटर उचकटुन,त्यावाटे दुकानात प्रवेश करून,दुकानातील ड्रॉव्हर मध्ये ठेवलेली ७०००/- रूपये रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेली आहे. तसेच सदर ठिकाणी असलेले १.आरूज ब्युटी पार्लर २.के.के. फायनान्स ३.साक्षी एंटरप्रायजेस ४.श्रेयस कॉंपीयर्स या दुकानांची कुलुप लावुन बंद केलेली शटर्स अर्धवट उचकटुन त्या दुकानामध्ये प्रवेश घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा.पवार ९७६५८२४७०८ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७६५/१७,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | बिस्मिल्ला बाबा शेख,वय-३८ वर्ष,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | १.सतिश विठ्ठल गिरी,वय-२३ २.योगेश विठ्ठल गिरी,वय-२५ ३.संदिप शरद बन,वय-२६ रा.सनमुख वाडी पदमावती मंदीर,दिघी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०८/२०१७ रोजी १६/३० वा. ते दि.१७/०९/२०१७ रोजी १७/१५ वा.चे दरम्यान फ्लॅट नं.के-१०५,लक्ष्मीपुरम मेंटल कॉर्नर,येरवडा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप बनावट चावीने उघडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्याचे दागिने असा एकुण ३७,०६,७००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. (फिर्यादी यांनी खात्री करून आजरोजी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रविण देशमुख ९५५२११०१०० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३५७/१७,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | सौरभ कालरा,वय-३१ वर्षे,रा.खराडी,पुणे |
| **आरोपी** | १.निलेश दिपक नाईक २.दिपक दिंगबर नाईक,रा.४१,सैनिक कॉलनी,मोरे शाळे जवळ, कोथरुड,पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसेंबर २०१३ ते दि.२३/०९/२०१७ रोजीचे कालावधीत दि हेमलेंट प्रोजेक्टचे ऑफिस सैनिक मोरे शाळे जवळ,कोथरुड,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी पुनावाला स्टड फार्म जवळ,स.न.१४४,स.न.१४५,१४६,थेऊर,पुणे याठिकाणी दी हेमलेट प्रोजेक्ट बाबत ९९ एकर डॉट कॉम या वेबसाईटवर त्यांची जाहिरात करुन,त्याद्वारे फिर्यादी व इतर लोकांना आकर्षित करुन,त्यांचेकडुन रो-हाऊस व घरे दोन वर्षात पुर्ण करुन ताबा देण्याचे अमिष दाखवुन, सन-२०१३ व २०१४ मध्ये फिर्यादी यांचेकडुन १०,००,०००/- रुपये चेकद्वारे व इतर व्यक्तींकडुन ८५,३०,०००/- रुपये रक्कम घेवुन, आजपोवेतो सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु न करता,अगर फिर्यादी व इतर साक्षीदारांचे पैसे परत न करता,फिर्यादी व इतर लोकांच्या विश्वासघात करुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जाखडे ९४२२५०८५३४ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २४६/१७,भादविक ४०३,४०६,४०९,४२०,३४,महा.प्रोटेक्शन ऑफ इंटरेस्ट ऑफ डिपॉझीटर क.३ |
| **फिर्यादी** | अनिल मर्दा,वय-५५,रा.मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | बुलढाणा अर्बन कॉ.ऑप.क्रेडीट सोसायटीचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/०८ ते दि.२२/०९/१७ रोजीचे कालावधीत बुलढाण अर्बन कॉ.ऑप.क्रेडीट सोसा. प्रभात रोड,डेक्कन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी बुलढाणा अर्बन कॉ.ऑप.क्रेडीट सोसायटी या बँकेमध्ये ९० लाख रुपये मुदत ठेव म्हणुन ठेवली असताना,सदर बँकेचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी यांनी फिर्यादी यांनी ठेवलेल्या मुदत ठेवीवर जमा झालेले व्याज व मुळ रक्कमेचा,स्वतःचे फायद्यासाठी वापर करुन,सदर रकमेचा अपहार करुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जोशी ९८५०६६४८४५ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७६४/१७,भादविक ३२५,१४३,१४७,१४९,४२७ |
| **फिर्यादी** | सुनिल पंचमुख,वय-२२ वर्ष,रा.बेरगांव,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी सात ते आठ इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०९/२०१७ रोजी १९/३० वा.विक्रीकर भवन समोरील रोडवर,कॉमर झोन येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह मोटार सायकलवरून जात असताना,त्यांचे बाजुने जाणारे मोटार सायकलवरील इसमांनी त्यांची गाडी अचानक बाजुला घेतल्याने,फिर्यादी यांनी गाडी व्यवस्थीत चालवा असे म्हणाल्याचे कारणावरून त्याचा राग मनात धरून त्यांचे मोबाईलवरून सात ते आठ मित्रांना बोलावुन घेवुन,फिर्यादी व त्यांचे मित्रांसोबत वाद घालुन,त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्यामध्ये फिर्यादी यांना उजवे बरगडीत फ्रॅक्चर व फिर्यादी यांचे मित्रांस मुका मार लागुन जखमी केले आहे. तसेच त्यांचेमध्ये झालेल्या झटापटीत फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन,पाकीट व मोबाईल पडुन फिर्यादीचे नुकसान झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गवारी |

**<u>भाग-६ चा गुन्हा</u>** **<u>दि.२४/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

| | |
|---|---|
| १ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३१८५/१७,भादविक ५०६ व महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासुन व्यक्तीचे संरक्षण प्रति. अधि.२०१६ चे क.३(१)(४)(७) सह ५ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३९,रा.विश्रांतवाडी,पुणे |
| **आरोपी** | १.अध्यक्ष- निमकर गणेश २.खजिनदार- प्रशांत दावलु अंगी ३.सचिव- प्रकाश पिंपळकर ४. सहसचिव- सुधीर पिंपळकर ५.सहसचिव- विलास चिंचणे ६.उपाध्यक्ष-उमाकांत बेलीदकर ७.संघटक- येपुर बाबुलाल ८.संघटक- किशोर गरसुंद ९.संघटक-अनिल तेलंग (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/११/१९९९ ते दि.२३/०९/२०१७ रोजीचे कालावधीत वेळोवेळी धोबी गल्ली,मरिआई मंदिर,खडकी बाजार,पुणे येथे व ठिक-ठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी समाजाचे जाती बाहेरील मुलीशी विवाह केल्याचे कारणावरून फिर्यादी यांचे समाजाचे यातील नमुद इसम सदस्य (पंच कमिटी) यांनी फिर्यादी यांना त्यांचे समाजात सभासदत्व दिले नाही. तसेच फिर्यादी यांनी त्यांची मुले मोठी झाली आहेत म्हणुन त्यांना समाजात घेण्याबाबत वेळोवेळी व ठिक-ठिकाणी लेखी पत्र देवुन विनंती केली असताना,सदर इसम सदस्य (पंच कमिटी) यांनी फिर्यादी यांचे कही एक ऐकुन न घेता,तुम्हाला समाजात घेणार नाही,तुम्हाला जे काही करता येईल ते करी अशी धमकी देवुन,त्यांना समजात सामावुन घेतले नाही. त्याचप्रमाणे फिर्यादी हे लग्न समारंभास गेल्यास त्यांना अपमानास्पद वागणुक देवुन,त्यांना वेळोवेळी अपमानित करून मानसिक त्रास दिला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. व्हि.एस.आजगेकर ७७७४०३२४४६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**